# फिट इंडिया मोहिमेंतर्गत चामुंडा माता होमिओपॅथी महाविद्यालयातर्फे प्रभातफेरी

**जळगाव** | चामुंडामाता होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे फिट इंडिया मोहिमेंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व स्वयंसेवकांसाठी प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते. समाजात सुदृढ आरोग्याबाबत प्रचार व प्रसार व्हावा यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, महाविद्यालयातील कर्मचारी यांनी चिंचोलीत समन्वयिका डॉ. अलकनंदा पागे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभातफेरी काढली. कार्यक्रमास संस्थाध्यक्ष पी. ई. पाटील व सचिव राहुल पाटील यांचे सहकार्य लाभले.